**अभिलेख कक्ष**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

दिनांकः- २२/०३/२०२१

**विषयः- संस्थानकडील निरूपयोगी भंगार साहित्य तसेच जुन्या वाहनांचा जाहीर लिलाव स्थगित करणेबाबत....**

श्री साईबाबा संस्थानकडील निरूपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची व जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी दि.०४/०२/२०२१ रोजीचे मा.तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जुन्या वाहनांची व डेडस्टॉक साहित्याची बुधवार, दि.३१/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे वाहन विभाग परिसरात दोन्ही लिलाव एकेच दिवशी आयोजित करण्यात आलेले होते.

परंतु, सध्या महाराष्ट्र राज्य तसेच अहमदनगर जिल्हयात कोव्हीड १९ विषाणुचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. विशेषतः शिर्डी परिसरात कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे तसेच संस्थानमधील ब-याच कर्मचा-यांना सध्या कोरोना विषाणुची बाधा झालेली आहे. या पार्श्वभुमीवर बुधवार दि.३१/०३/२०२१ रोजी होणारा निरूपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्यांचा व जुन्या वाहनांचा जाहीर लिलाव तुर्त स्थगित करण्यात येत आहे तसेच कोव्हीड १९ विषाणुचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर लिलावाची पुढील तारिख अलहिदा संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

**(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**